# कृषि उत्पन्न बाजार समिती,अमळनेर

ता.अमळनेर जि.जळगांव (महाराष्ट्र)

## सरळसेवा पदभरती

कृषि उत्पन्न बाजार समिती,अमळनेर जि.जळगांव यांचे आस्थापने वरील खाली दिलेल्या संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडुन केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे संकेतस्थळ:- www.apmcamalner.in

- **सवंर्ग निहाय रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे:-**

| प्रवर्ग | अनु.जाती १३% | अनु. जमाती ७% | वि.जा. .अ.३% | भ. ज. ब. २.५% | भ.ज. क. ३.५% | भ. ज. ड. २% | वि. मा. प्र. २% | इ. मा. व. १९% | सामाजिक व शैक्षणिक मागावर्ग १०% | इ. डब्लयु. एस १०% | खुला २८% | एकुण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उपसचिव | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| निरीक्षक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ |
| सुपरवायझर | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ |
| क.लिपीक | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | -- | ०१ | ०३ |
| शिपाई | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०१ | ०३ | ०८ |
| पहारेकरी | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०३ |
| माळी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| कनिष्ठ अभियंता | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |

- **सेवा प्रवेशानुसार किमान शैक्षणिक अर्हता व पद निहाय वेतनश्रेणी :-**

कृषि उत्पन्न बाजार समिती अमळनेर, जि. जळगांव

- **सेवा प्रवेशानुसार किमान शैक्षणिक अर्हता व पद निहाय वेतनश्रेणी :-**

| प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| **उपसचिव** | शासन मान्यताप्राप्त संविधीक विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी व MS-CIT (कृषी पदवि प्राधान्य) | एस १० (३५४००-१३२०००) |
| **निरीक्षक** | शासन मान्यताप्राप्त संविधीक विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी व MS-CIT | एस ८ (२५५०० – ८११००) |
| **सुपरवायझर** | शासन मान्यताप्राप्त संविधीक विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी व MS-CIT | एस ८ (२५५०० – ८११००) |
| **कनिष्ठ लिपीक** | शासन मान्यताप्राप्त संविधीक विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी व MS-CIT टंकलेखन (मराठी ३० प्रति /इग्रंजी प्रति ४० सदर प्रमाणपत्र नसल्यास दोन वर्षाच्या कालावधीत सादर करता येईल. | एस ६ (१९९०० – ६३२००) |
| **शिपाई** | एस.एस.सी (१० वी उत्तीर्ण आवश्यक | एस १ (१५००० – ४७६००) |
| **पहारेकरी** | एस.एस.सी (१० वी उत्तीर्ण आवश्यक | एस १ (१५००० – ४७६००) |
| **माळी** | एस.एस.सी (१० वी उत्तीर्ण आवश्यक | एस १ (१५००० – ४७६००) |
| **क.अभियंता** | शासन मान्यताप्राप्त संविंधीक विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदविका किंबा पदवी असणे अनिवार्य आहे. | एस ८ (२५५०० – ८११००) |

- **वयोमर्यादा** :- उपरोक्त पदासाठी अर्ज करण्या-या उमेदवाराचे वय दिनांक १४/०९/२०२५ रोजी दिनांकास अराखीव प्रवर्गासाठी किमान वय १८ वर्षे व कमाल वय ३८ वर्षे राहील.मागावर्गीय उमेदवारांना ४३ वर्षे वय सिथिल राहील.

- **सरळसेवा पदभरती वेळापत्रक**

| अ.नं. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि. १५/०८/२०२५रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून ते दि. १४/०९/२०२५ रोजी सांयकाळी ११.५९ वाजेपर्यंत |
| २. | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा .. शुल्क भरणा करण्याची अंतिम दिनांक | दि. १४/०९/२०२५ रोजी सांयकाळी ११.५९ वाजेपर्यंत |
| ३. | परीक्षा प्रवेश पत्र ऑनलाईन प्रिंट काढुन घेणे | याबाबत संकेतस्थळावर सुचना प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४. | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक | याबाबत संकेतस्थळांवर सुचना प्रसिध्द करण्यात येईल. |
| ५. | परीक्षेचा निकाल,कागदपत्र पडताळणी इत्यादी सुचना | याबाबत संकतेस्थळावर सुचना प्रसिध्द करण्यात येईल. |

- आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकात बदल झाल्यास याबाबत वेळोवेळी www.apmcamalner.in संकेतस्थळावर सुचना प्रसिध्द करण्यात येईल. अशा सुचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची उमेदावारांनी दक्षता घ्यावी.

- **परिक्षा शुल्क** :- राखीव प्रवर्गाकरीता रु.४००/- + १८% जी.एस.टी. = रु. ४७२/-
  अराखीव प्रवर्गाकरीता रु. ६००/- + १८% जी.एस.टी. = रु.७०८/-

## सरळसेवा पदभरती संदर्भात महत्वाच्या सूचना खालील प्रमाणे आहे.

१. सर्व पदाकरीता स्वतंत्रपणे ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल.
२. उपसचिव,निरीक्षक,सुपरवायझर,कनिष्ठ लिपीक, शिपाई,पहारेकरी, आणि,माळी या पदासाठी एकुण २०० गुणांची ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल.

४. उमेदवार एकापेक्षा अधिक सर्वगांसाठी अर्ज करावयाचे असल्यास अश्या प्रत्येक सवंर्गासाठी स्वतंत्र ऑनलाईन अर्ज सादर करावा लागेल. त्यासाठी स्वतंत्र शुल्क भरणे बंधन कारक राहील.

५. पात्र उमेदवाराने कृषी उत्पंन्न बाजार समितीचे www.apmcamalner.in या संकेत स्थळावर दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन ऑनलाईन अर्ज सादर करावा. प्रस्तुत पदासाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही पध्दतीने प्राप्त झालेला अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

६. उमेदावाराने संपूर्ण जाहीरातीचे वाचन करुनच अर्ज भरावा. संपूर्ण भरलेला अर्ज submit केल्यानतंर त्या अर्जाची printout काढावी. सदरील अर्ज उमेदवाराने स्वत; जवळ निवड प्रक्रियेसाठी जतन करुन ठेवावा. सदरील अर्ज व शैक्षणिक कागदपत्रे या कार्यालयात पोस्टाने पाठवु नयेत.

७. परीक्षा शुल्क ना परतावा आहे.

८. परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९. राखीव प्रवर्गातील उमेदावारांकडे अर्ज भरतांना / निवड प्रक्रियेच्यावेळी नॉनक्रिमिलेयर प्रमाणपत्र ,अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate ) व जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१०. उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेत मिळविलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ते नुसार विचार क्षेत्रातील उमेदवांराना कागदपत्रे पडताळणी करीता बोलविण्यात येईल त्यावेळेस उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर करतांना जी शैक्षणिक माहिती सादर केलेली आहे. तीच कागदपत्रे ग्राह्य धरण्यात येईल. सदर कागदपत्र पडताळणी करीता बोलविण्यात आल्यास निवड झाली असा उमेदवाराला दावा करता येणार नाही.

११. उमेदावारांना ऑनलाईन परीक्षा तसेच कागदपत्र पडताळणीला स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

१२. जाहीरातीतील कोणत्याही पदावर निवड करुन घेण्यासाठी उमेदावाराने अयोग्य मार्गाचा अवलंब केल्यास संबधित उमेदवाराला भरती प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

१३. भरती प्रक्रिये दरम्यान वेळो वेळी संकेतस्थळ पाहून भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

१४. अर्ज करतांना उमेदावारांनी valid असलेल्या मोबाईल क्रमांक व ई-मेल आय.डी. सक्रिय असायला हवा. तसेच मोबाईल क्रमांक हा (DND Activate)नसावा संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणीमुळे SMS /Email उमेदवार पर्यत पोहचू शकत नाही. त्याकरीता कृषि उत्पन्न बाजार समिती,अमळनेर जबाबदार राहणार नाही.

कृषी उत्पन्न बाजार समिती अमळनेर अमळनेर, जि. जळगाव

१५. उमेदावारांची ऑनलाईन परीक्षा ही कोणत्याही शैक्षणिक कागदपत्रांची पूर्व तपासणी / छाननी न करता घेण्यात येणार आहे. त्यामुळे परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे निवडी बाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही. किंवा त्याबाबत उमेदवाराला तक्रार करता येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१६. ऑनलाईन परिक्षेचे ठिकाण व दिनांक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१७. जाहीरात मध्ये नमुद केलेल्या पदांच्या संख्या, आरक्षण, परीक्षा स्थगीत करणे, रद्द करणे किंवा अंशत; बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार सभापती / सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती,अमळनेर यांना राहतील व या संदर्भातील त्यांचा निर्णय अंतिम राहील. या बाबत उमेदवारास कोणताही दावा करता येणार नाही.

१८. उमेदावारांना अर्ज भरतांना तांत्रिक अडचण किंवा शंका निर्माण झाल्यास संकेतस्थळावर दिलेल्या Helpline क्रमांकावर फोन करुन मदत घ्यावी.

१९. म.पणन संचालकसो। यांच्या मान्यतेनुसार सुरुवातीचे 3 वर्षे फिक्स पगारावर सेवा करणे अनिवार्य राहील. उपसचिव – १३०००/- रु.मात्र निरीक्षक – १२०००/-रु. सुपरवायझर – १२०००/- रु.मात्र क.लिपीक – ११०००/- रु. मात्र शिपाई, पहारेकरी, माळी प्रत्येकी – १००००/- रु.मात्र क.अभियंता – १२०००/- रु.मात्र प्रतिमाह सुरुवातीचे तिन वर्षे लागू राहतील तसेच म.पणन संचालकसो। यांची परिपत्रके व आदेश बांधील राहतील.

**सभापती** **उपसभापती** **सचिव**

कृषि उत्पन्न बाजार समिती,अमळनेर जि.जळगांव

